# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १९१ वा ❑ मंगळवार दि.१६ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## नियम धाब्यावर.. विद्यार्थी सुरक्षा वाऱ्यावर!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

स्कुल व्हॅन, रिक्षामधून दररोज हजारो विद्यार्थी प्रवास करतात. मात्र, या वाहनधारकांकडून सुरक्षा नियमांचे पालन होत नसल्याचे वास्तव परत एकदा समोर  आले आहे. नागपूर मध्ये स्कूल व्हॅन बसची भीषण धडक होऊन विद्यार्थिनीसह चालकाचा मृत्यू झाला या अपघातात आठ विद्यार्थी जखमी झाले. नागपूर शहरातील मानकापूर उड्डाण पुलावर स्कूल व्हॅन आणि बसमध्ये सकाळी आठ वाजता जोरदार धडक होऊन अपघात झाला हा अपघात इतका भीषण होता की स्कूल व्हॅनच्या समोरील भागाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना वाहनात कोंबणे, वाहनाची तांत्रिक स्थिती उत्तम नसणे, वाहनाबाहेर लटकलेली दफ्तरे, वाहनात सहायक नसने यासह स्कूल बस धोरण २०११ च्या नियमावलींचा भंग करणाऱ्या गोष्टीमुळे विद्यार्थ्यांची ससेहोलपट तर होतेच शिवाय सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत आहे. एकिकडे वाहनांसाठी मासिक भाडे परवडत नाही म्हणून चालक अधिक विद्यार्थी वाहनात बसवतात तर दुसरीकडे पालकही याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. त्यामुळे चिमुकल्यांच्या जीवांशी खेळ खेळला जात असल्याचे भीषण वास्तव समोर येत आहे.

स्कूल व्हॅन मध्ये ८ अधिक १ ची क्षमता असताना वाहन चालक १४ ते १५ विद्यार्थी कोंबले जातात.मात्र पोलिसांकडून चौकशी होत नाही.शाळांकडूनही शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षा, व्हॅन्स चालकांना प्रमाणपत्र दिले जाते. सुरक्षित प्रवासासाठी जी मार्गदर्शक तत्वे असतात. त्याचे पालन केले जात नाही.

पालकआर्थिक अडचणीमुळे आपल्या पाल्याला खाजगी स्कूल व्हॅन– रिक्षातून शाळेत पाठवतात. अशा पद्धतीने मुलांचा जीव धोक्यात घालण्यापेक्षा पालकांनीही आपल्या पाल्याच्या विशेष  काळजी घ्यावी..व्हॅन ची सोय होत नसेल.. तर स्वतः पालकांनी आपल्या मुलांना शाळेत सोडण्याची व्यवस्था करावी.क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी ज्या व्हॅनमधून नेले जातात अशा व्हॅनमधून पालकांनी मुलांना शाळेत पाठवूच नये. खासगी व्हॅन चालकांनी पालकांकडून अधिक दर आकारु नये. मुलांच्या जीवाशी खेळू नये. पालकांनीही नियमाप्रमाणे पैसे द्यावे.

क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी नेणाऱ्या वाहनातून पालकांना पाल्य पाठवूच नये. नियमभंग करणाऱ्या वाहनांवर नियमित कारवाई तसेच प्रसंगी विशेष मोहीम राबवून कारवाई केली पाहिजे.

वाहनचालकांनी व वाहन चालक संघटनांनी स्कूल व्हॅन चे नियम धाब्यावर न बसवता क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी बसू नये व वेगावर नियंत्रण ठेवावे. तशा सूचना चालकां द्यावी.

असे आहेत नियम

वाहनाला शालेय विद्यार्थी वाहतूक परवाना आवश्यक आहे

वाहनाचा रंग पिवळा असायला पाहिजे.शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनात महिला सहायक असायला पाहिजे.

अंतर्गत आसन व्यवस्था चांगली असावी, त्याचबरोबर आसनाच्या बाजूला हँडल असावीत.वाहनात अग्निशामक उपकरण बसविणे आवश्यक आहे.

बसमध्ये उभे राहिल्यास धरण्यासाठी हँडल पाहिजे

खिडकीच्या बाहेरील बाजूस आडवे लोखंडी बार आवश्यक. आपत्कालीन दरवाजा आवश्यक आहे.धोक्याचा इशारा देणारी प्रकाश योजना व घंटी हवी

शालेय प्रयोजनासाठी वापरण्यात येत असल्यामुळे गाडीवर विद्यार्थ्यांचे चित्र असावे.गाडीमध्ये बॅग ठेवण्यासाठी जागा हवी

आसनाच्या मागच्या बाजूस हँडल आवश्यक आहे. प्रथमोपचार पेटी अनिवार्य आहे.बसमध्ये चढण्यासाठी खालची पायरी हवी

फिटनेस तपासणी वेळेवर करावी.शालेय विद्यार्थी वाहतुकीचा परवाना असावा.

वाहनाचा इन्शुरन्स असावा.

आसनक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी भरू नयेत.खासगी वाहनांमधून शालेय वाहतूक करू नये.

विशेष म्हणजे स्कूल व्हॅनच्या नावावर अनेक खासगी व्हॅन विद्यार्थ्यांची ने आण करतात. विद्यार्थ्यांची ने आण करताना त्यांची सुरक्षा मात्र धाब्यावर बसविली जाते  यातील अनेक स्कूल व्हॅनना फिटनेस प्रमाणपत्र नसताना रस्त्यांवर सरार्सपणे धावताना दिसतात.स्कूल व्हॅन चालकांकडून सध्या फक्त त्यांच्या गाड्यांना पिवळा रंग मारून गाड्या वापरल्या जात आहेत.

नियमानुसार विद्यार्थ्यांची ने–आण करण्यासाठी शाळा प्रशासनाशी करार करणे गरजेचे असते. मात्र, मुंबईतील रस्त्यांवर धावणाऱ्या स्कूल व्हॅन आणि शाळांशी कोणताही करार नसताना देखील ते विद्यार्थ्यांची ने आण करतात.

मध्यंतरी जून मध्ये अंबरनाथ मध्ये एक धक्कादायक समोर आली होती. खासगी स्कुल व्हॅन्सकडून आरटीओची कोणतीही परवानगी नसतानाही अवैधरित्या विद्यार्थ्यांची वाहतूक केली जात असल्याची बाब समोर  आली होती. शहरातल्या अनेक शाळांमध्ये खुलेआमपणे हा प्रकार सुरू असून एकेका इको व्हॅनमध्ये २०–२० विद्यार्थ्यांना अक्षरशः कोंबड्यांसारखं कोंबून नेलं जात आहे.असं असतानाही आरटीओ, वाहतूक पोलीस आणि शाळा प्रशासनाकडून या प्रकाराकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केलं जाते.मात्र ही वाहतूक करण्यासाठी आरटीओ आणि शाळेची परवानगी आवश्यक असते. तसंच विद्यार्थी सुरक्षा कायदा आणि शासनाच्या नियमांची पूर्तता करणंही आवश्यक असतं. मात्र हे नियम धाब्यावर बसवून अनेक शाळांमध्ये खासगी इको व्हॅनमधून विद्यार्थ्यांची ने आण केली जाते.

यासाठी खासगी व्हॅन मालकांनी इको गाडीच्या रचनेत बदल करून सीएनजी सिलेंडरच्या वर देखील सीट बसवल्या जातअसून सीएनजी सिलेंडरवर ८ विद्यार्थ्यांना बसवलं जातं, तर एका इको गाडीत तब्बल २० विद्यार्थ्यांना कोंबलं जातं.यामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात आले असून पालक,शाळा व वाहतूक विभागाने यावर विचार मंथन करण्याची व विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका होणार नाही यावर विचार करण्याची गरज आहे.

# अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचा महानायक विश्वास पाटील

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ‘पानिपत’कार विश्वास पाटील यांची निवड करण्यात आली आहे. १ ते ४ जानेवारी या कालावधीत शाहू स्टेडियम येथे मराठी साहित्यिकांचा महोत्सव भरणार असून, या संमेलनासाठी प्रथमच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या सर्व पूर्वाध्यक्षांना, सरस्वती सन्मानप्राप्त लेखकांना, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त निवडक लेखकांना तसेच साहित्य महामंडळाच्या माजी अध्यक्षांना निमंत्रित केले जाणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या रविवारी झालेल्या बैठकीत साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड करण्यात आली.




साहित्य महामंडळाच्या घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थांनी विश्वास पाटील यांचे नाव अग्रक्रमाने सुचविले होते. दुसऱ्या कोणत्याही नावाची चर्चा झाली नाही. एकमताने पाटील यांची निवड करण्यात आल्याने बैठकीमध्ये मतदान घेण्याची वेळ आली नाही, अशी माहिती साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेने संमेलनाचे आयोजन केले असल्याने नैतिकता म्हणून पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने कोणाचेही नाव अध्यक्षपदासाठी सुचविले नाही, असे जोशी यांनी स्पष्ट केले. साहित्य महामंडळाचे उपाध्यक्ष गुरय्या स्वामी, कार्यवाह सुनीताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी या वेळी उपस्थित होते. महामंडळाच्या मार्गदर्शन समितीने संयोजकांसमवेत ठरविलेल्या कार्यक्रमाच्या आराखड्यास साहित्य महामंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले.

**साहित्य संमेलनाचे आकर्षण**

संमेलनाच्या उद्घाटनाच्या आधी ग्रंथदिंडी निघणार असून, दुपारी ग्रंथ प्रदर्शनाचे, कविकट्टा आणि बालकुमारांसाठीच्या आनंद मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी साहित्य संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. वाचकांना चारही दिवस ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेता येणार आहे. या संमेलनात चर्चेतून परिसंवादातील विषयांना न्याय दिला जाणार आहे. निमंत्रितांचे कविसंमेलन, समकालीन गाजलेल्या पुस्तकावरील चर्चा, मान्यवर लेखकांच्या मुलाखती, नामवंत कादंबरीकारांशी संवाद असे विविध दर्जेदार कार्यक्रम होणार आहेत. या साहित्य संमेलनाचे आयोजन शाहू स्टेडिअमवर होणार आहे. हे स्टेडियम १४ एकरमध्ये असून तिथे मुख्य मंडप, इतर मंडप, ग्रंथ प्रदर्शन, कवी, गझलकट्टा, तसेच भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. इतर छोटे कार्यक्रम करण्यासाठी तीन सभागृहे उपलब्ध आहेत. स्टेडियममध्ये २५ हजार प्रेक्षक क्षमता असलेली गॅलरी आहे. हे स्टेडियम सातारा बस स्थानकापासून पायी चालत जाण्याच्या अंतरावर असून शहराच्या मध्यभागी असल्याने शहरातील आणि बाहेरून येणाऱ्या साहित्य रसिकांची सोय होणार आहे.

## विश्वास पाटील यांच्या निवडीचे ज्येष्ठ साहित्यिकांसह प्रकाशकांकडून स्वागत

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – साताऱ्यात होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील यांचे ज्येष्ठ–श्रेष्ठ कवी–साहित्यिकांसह प्रकाशकांनी अभिनंदन केले आहे. मराठीतील जाणकार आणि इतिहासाचे अभ्यासक म्हणून विश्वास पाटील यांची ख्याती असल्याचे म्हटले आहे.



या पूर्वी साताऱ्यात झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विद्याधर गोखले होते. विश्वास पाटील यांनी पानिपत, संभाजी, झाडाझडती, महानायक, पांगिरा अशा अजरामर कलाकृती निर्माण केल्या. अखिल भारतीय साहित्य मंडळाने खूप दिवसांनंतर लोकांच्या मनातील आणि तेवढाच ताकदीचा साहित्यिक संमेलनाध्यक्ष म्हणून निवडल्याचे साहित्यिकांनी म्हटले आहे.

**सातत्याने नवनवे प्रयोग**

विश्वास पाटील लोकप्रिय आणि वाचकप्रिय लेखक आहेत. माझे फार जुने स्नेही आहेत. पाटील जेव्हा फिल्म सिटीत कार्यकारी अधिकारी होते, तेव्हाही त्यांच्याशी माझे संबंध आले. मराठीतील जाणकार आणि इतिहासाचे अभ्यासक म्हणून पाटील यांची ख्याती आहे. सुरुवातीपासून त्यांनी कथेत अनुभवलेले ग्रामीण जीवन मांडले आहे. कथा, कादंबरी लेखनात तपशीलाची मांडणी ते बारकाईने आणि लालित्यपूर्ण करतात. लेखनात विचाराचे सूत्र ते ढळू देत नाही. विशेषत: ऐतिहासिक कादंबरीतून त्यांनी इतिहास डोळसपणे मांडला आहे. कालच्या इतिहासाचं आणि आजच्या वर्तमानाचं नातं नव्याने जोडून घेताना त्यांच्या लेखनातल्या सर्जशिलतेत एक अलौकिक आविष्काराची नवी धाटणी दिसते. विश्वास पाटील यांनी सातत्याने आपल्या लेखनामध्ये नवनवे प्रयोग करून प्रतिभेची क्षमता सिद्ध केली आहे.

**– फ. मुं. शिंदे,**
प्रसिद्ध ज्येष्ठ कवी.

**दुर्मिळातील दुर्मिळ लेखक**

विश्वास पाटील मराठीतील ऐतिहासिक आणि सामाजिक लेखन करणारे दुर्मिळ लेखक आहेत. पानिपत, महानायक या ऐतिहासिक, तर  झाडाझडती आणि पांगिरा या सामाजिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. आमच्या पिढीतील एक साहित्यिक अ. भा. साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाला, याचा आनंद आहे. मराठी भाषेबाहेर ओळख असलेले विश्वास पाटील मराठीतील एक महान लेखक आहेत. मराठी व्यतिरिक्त हिंदी, इंगजी, कानडी, आसामी आदी भाषा त्यांना अवगत आहेत. ज्ञानपीठ प्रकाशनाने पाटील यांची सर्व पुस्तके हिंदीत अनुवादित केली आहेत.

**– इंद्रजित भालेराव,**
ख्यातनाम कवी

**पाटलांची निवड भूषणावह**

विश्वास पाटील यांनी मराठी संस्कृतीचं संचित अतिशय ठसठशीतपणे आपल्या लेखणीतून व्यक्त केलं आहे. मराठी संस्कृतीची स्वाभिमानाची कमान विश्वास पाटलांच्या लेखणीमध्ये आपल्याला प्रतीत होते. विश्वास पाटील यांची अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी झालेली निवड ही भूषणावह बाब आहे. मी विश्वास पाटील यांचं आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे मनापासून अभिनंदन करतो!

**– डॉ. ऋषिकेश कांबळे,**
ज्येष्ठ लेखक, समीक्षक.

**साहित्य क्षेत्रात मोलाची भर**

विश्वास पाटील यांनी आपल्या लेखनातून ऐतिहासिक व सामाजिक बारकावे अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले आहेत. त्यांचे लेखन मराठी साहित्यात आपले वेगळेपण टिकवून आहेत. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनाने मराठी साहित्याला एक नवी उंची लाभली आहे. समाजाकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन विश्वास पाटलांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या देतात. विश्वास पाटलांच्या साहित्याने मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. विश्वास पाटील यांची अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे आणि अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे मनापासून अभिनंदन.

**– हबीब भंडारे,**
प्रसिद्ध कवी, लेखक.

**वाचक प्रिय कादंबरीकार**

विश्वास पाटील यांनी व्यापक पट असलेल्या कादंबरी या वाड्.मय प्रकारात महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. पानिपतची लढाई हा विषय घेऊन लिहिलेल्या पानिपत या कादंबरीने मोठा वाचकवर्ग निर्माण केला आहे. धरणामुळे विस्थापित होणाऱ्या गावाचं दु:ख मांडणारी झाडाझडती कादंबरी आजही अस्वस्थ करते. डोंगरवाडी व पांगिरा या दोन गावांची गोष्ट पांगिरा ने सांगितलीय. यासोबतच ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून विश्वास पाटलांचा नावलौकिक आहे. लाखोंच्या घरात वाचकवर्ग निर्माण करणारा व अनेक आवृत्त्या खपणाऱ्या कादंबऱ्यांच्या लेखकाची अ. भा. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली, ही आनंददायक गोष्ट आहे.

**–प्रा. रमेश रावळकर,**
कवी व कादंबरीकार

**कादंबरी लेखनात स्वतंत्र ओळख**

कादंबरीकार लेखक विश्वास पाटील यांची साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याचे कळताच मनापासून आनंद झाला. पानिपत, झाडाझडती यांसारख्या कादंबरीचे लेखन करून त्यांनी मराठी कादंबरीच्या कक्षा रुंदावल्या. चंद्रमुखी सारख्या कादंबरीतून त्यांनी कलावंतांच्या जगण्याची दर्दभरी कैफियत मांडली. ऐतिहासिक कादंबरीचे लेखन करून मराठी कादंबरीच्या प्रांतात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. साहित्यक्षेत्रात या निमित्ताने आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पाटील यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

**– डॉ. विष्णू सुरासे,**
प्रसिद्ध हास्यकवी.

**प्रकाशकांकडूनही स्वागत**

याशिवाय प्रसिद्ध साहित्यिक व प्रकाशक बाबा भांड आणि मराठवाडा साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष व प्रकाशक कुंडलिकराव अतकरे यांनी देखील मराठी साहित्य विश्वातील महान लेखक विश्वास पाटील यांचे अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल समाधान व्यक्त करून, त्यांचे अभिनंदन केले आहे.

## कवी वीरा राठोड यांच्या ब्लेस अस ऑल कविता संग्रहाचे प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई–** साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त कवी वीरा राठोड यांच्या डॉ. एल. एस. देशपांडे यांनी इंग्रजीत अनुवादित केलेल्या व रेड रिवर पब्लिकेशन दिल्ली यांनी प्रकाशित केलेल्या ब्लेस अस ऑल या कविता संग्रहाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम मंथन मल्टीलिंगवल असोसिएशन अंतर्गत के.जी.सोमय्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय विद्या विहार मुंबई येथे ज्येष्ठ संपादक तथा माजी खासदार कुमार केतकर यांच्या अध्यक्षतेखाली व त्यांच्या हस्ते संपन्न झाला.

या कवितासंग्रहावर कवी प्रा. अश्विनी कुमार (टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मुंबई) आणि संजीव खांडेकर (कवी आणि विजुअल आर्टिस्ट) यांनी भाष्य केले. या समारंभासाठी प्राचार्य डॉ. किसन पवार व रेड रिवर पब्लिकेशनचे दिव्यज्योती सर्मा यांची आयोजक या नात्याने विशेष उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. किसन पवार यांनी सर्वांचे स्वागतपर मनोगत व्यक्त करताना ‘‘मंथन मल्टीलिंगवलं असोसिएशन‘‘ या उपक्रमाबद्दल सर्वांना परिचय करून दिला. ज्येष्ठ संपादक व विचारवंत कुमार केतकर यांनी कविता संग्रहावर भाष्य करताना सांगितले की, वीरा राठोड यांची ब्लेस अस ऑल ही कविता जगातल्या सर्व दुःखाशी नाळ जोडणारी आहे. सर्व जगाच्या कल्याणाचा विचार मांडणारी आहे. प्रतिरोधाची परंपरा साहित्यात नेहमीच जिवंत राहिली आहे. समाजातील कडेकपारीतून उमटणारे आवाज सतत प्रेरणा देत राहतात. हा प्रतिरोध विरांच्या कवितेमध्ये आहे. वीरा राठोड यांच्या कवितेत दिसणारा बंजारा समाजाचा संघर्ष म्हणजे पॅलेस्टाईन आणि अमेरिकेतील ब्लॅक समाजाच्या वेदनांशी जोडलेला सार्वत्रिक अनुभव आहे.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

### लघुलेख-४५



सत्तावीस नक्षत्रां मधील सहावे नक्षत्र हे 'आर्द्रा' आहे. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष "कृष्णागरु" आहे. हा वृक्ष पूर्व हिमालय, असाम, मेघालय, अरुणांचल अशा थंड परिसरांत आढळतो. हा वृक्ष थंड प्रदेशातच वाढतो, आपल्या परिसरांत आढळत नाही, या वृक्षाचा पर्यायी वृक्ष 'चंदन' आहे. हा वृक्ष मुळात थंड आहे. जैन पंथातील शिष्यगण चंदनाची पेस्ट पाण्यात मिसळवून पितात. त्यामुळे लैंगिक कामेच्छांचे दमन होते. चंदनाचा लेप दाहकनाशक असून त्वचेची आग, खाज थांबविणारा आहे

"कृष्णागरु" सुगंधी असल्याने धूप, अगरबत्ती इ. सुगंधी वस्तु बनविण्यासाठी या वृक्षाचा, त्याच्या 'पंचागां' चा उपयोग करतात, "आर्द्रा" नक्षत्राची आराध्य देवता शंकर' (रुद्र) आहेत. "ॐ नमः शिवाय" किंवा "ॐ रुद्राय नमः" हा जप या 'मिथुन' राशीच्या जातकांसाठी महत्वाचा असतो.

या नक्षत्राच्या जातकांनी जेव्हा 'वास्तुशास्त्र पेंटींग 'लावलेले असते, तेव्हा त्या पेंटींग मधील घटकांनी युक्त रंगयोजनांचा, जातकावर बऱ्याच प्रमाणांत सकारात्मक प्रभाव पडतो,असे निरिक्षण आहे. साहित्यात रुची, प्रकाशन जाहिरातदार, औषधाविक्री, कारागिरी, सेनादल,पोलीस, विद्यार्थी आणि त्यांची अभ्यासातील एकाग्रता, शांतप्रिय वातावरण, बुध्दी वृद्धी, विव्दत्ता, आर्थिक संपन्नता, व्यवसायात वृध्दी यांत थक्क करणारे अनुभव येतात.

या नक्षत्राच्या प्रथम चरणाचा स्वामी 'गुरु,' व्दितीय चरणाचा स्वामी 'शनि', तृतीय चरणाचे स्वामी देखील 'शनि' महाराज असून चतुर्थ चरणाचे स्वामी 'गुरु' आहेत. या प्रत्येक चरणां नुसार 'वास्तुशास्त्र पेंटींग' हे वेगवेगळे असते. या पेंटींग मध्ये देखील नक्षत्र पीडाहर मंत्र हा 'अक्षर-सुलेखनाच्या' रुपाने ते संकल्पन सजवते. थंड रंग म्हणजे 'शीत रंग' योजने मध्ये साकारले जाणारे या जातकाचे "वास्तुशास्त्र पेंटींग' वातावरणालाही शांत आणि स्वांत-सुखाय बनवते, असे निरिक्षण आहे.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



# जात्यावरच्या ओव्या......

---


लेकीला मागणं
लेक परक्याचं धन ?
असं नका म्हणू !
हे त मोगऱ्याच बन ||२५९||

लेकीला मागणं
मामाला घाई,
घावला नशिबान
असा हिरा जावई ||२६०||

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# आजी-आजोबा : वटवृक्षाची सावली





ज्योतिर्मय साहित्य

सुमारे ६०-६२ वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. मी त्यावेळी एका छोट्याशा खेड्यात राहत होतो. वय असेल ७/८ वर्षांचे. एकदा आई कुठल्यातरी कारणाने मामांकडे गेली होती. वडील, आजी आणि मी असे तिघेच घरी असायचो. त्यातही वडिलांच्या मागे शेतीची कामे, तसेच ते गावाचे पोलीस पाटील असल्याने तालुक्याच्या गावी त्यांना जावे लागत असे. मग काय माझी आणि आजीची गट्टी असायची. आजीच्या हातच्या स्वयंपाकाला फार छान चव होती. उपासाच्या दिवशी ती जी फोडणीची वरई करायची तिची चव अजूनही माझ्या जिभेवर आहे. आजी फारशी शिकलेली नव्हती पण तिला लिहावाचायाला येत होते. ती कुठल्याही शाळा कॉलेजात गेली नव्हती पण जीवनाच्या विद्यापीठाची डॉक्टरेट तिच्याकडे होती. कुठलीही गोष्ट कशी समजावून सांगायची याचे कौशल्य तिच्याजवळ होते. संस्काराचे विद्यापीठ होती आजी.



मी मित्रांमध्ये खेळून यायचो, जवळपासच्या शेतात जाऊन हुंदडायचो, उन्हात फिरल्याने, खेळल्याने प्रचंड तहान लागायची. धावत घरात आलो की माठाजवळ जायचो आणि पाणी प्यायचो. पण आजी मला थांबवायची. अरे थांब, तसाच माठाजवळ जाऊ नकोस. कुठून कुठून भटकून आला आहेस. आधी हात पाय धू, मग पाणी पी. त्यावेळी इतकी तहान लागलेली असायची की हात पाय धुण्यापुरता देखील धीर नसायचा. मग आजीचा राग यायचा. मी म्हणायचो, '' काय गं आजी, नेहमी असं करतेस ! बघ ना, माझे हातपाय स्वच्छ आहेत. त्यांना कुठे घाण लागलीय का ? '' आजी म्हणायची, '' बाळा, घाण अशी दिसत नाही पण जीवजंतू हातापायावर असतात. म्हणून हातपाय धुतल्याशिवाय घरातल्या कोणत्याच वस्तूला शिवू नये. '' त्यावेळी वाटायचं आजीला काही कळत नाही. उगीच हे शिवाशिवीचं भूत आपल्या डोक्यात घालते. पण मोठं झाल्यावर कळलं की जे मला कळलं नव्हतं ते आजीला कळलं होतं. आजी भलेही शाळा कॉलेजात गेली नसेल पण स्वच्छतेचा संस्कार तिने माझ्या मनावर जो केला, तो चिरंतन होता. कोरोनाच्या काळात तर आजीची शिकवण सारखी आठवायची. किती खरं होतं तिचं सांगणं ! आज थोडंफार काही झालं की आपण लगेच डॉक्टरांकडे जातो. पण त्या काळात खेड्यापाड्यात डॉक्टरच नव्हते. खूप काही गंभीर आजार झाला तर तालुक्याच्या गावी जावे लागे. पण आजीजवळ बहुधा सगळ्या छोट्या मोठया आजारांवर उपचार असत. तिच्या बटव्यात अशा दुर्मिळ गोष्टी हटकून असायच्याच. कोणी बाहेरच्या माणसाने जरी तिला सल्ला विचारला तरी आपल्या बटव्यातून ती औषधी वनस्पती काढून द्यायची आणि कसे घायचे ते सांगायची. त्या माणसाचा आजार हमखास बरा व्हायचाच ! दृष्ट लागणे या प्रकाराला भलेही कोणी अंधश्रद्धा म्हणो, पण मला बरे नसले की ते आजीला कळायचे. मग ती माझी दृष्ट काढायची.

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बद्धलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

आरंभ बिंदूकडून अंत्यबिंदूकडे जाताना मध्यबिंदू लागतो. त्यामुळे माणसाचे आणखी दोन वर्ग होतात. आरंभबिंदू सोडून मध्यबिंदू कडे सरकणारे हा तिसरा वर्ग आणि मध्यबिंदू कडून अंतबिंदूकडे सरकणारे हा चौथा वर्ग होय. तिसऱ्या वर्गातील माणसाला ''मुमुक्षु म्हणजे मोक्षाची इच्छा असणारा'' असे नाव दिले आहे. तर चौथ्या प्रकारचे लोक ''साधक'' या वर्गात येतात. जे साधना करतात तपश्चर्या करतात ते साधक लोक होय. आता यातील ऊत्तमोत्तम लक्षणे कोणती ते पाहू या.

साधक म्हणजे साधना करणारा.
परमार्थाच्या प्रगतिपथावर बद्धापेक्षां मुमुक्षु ऊत्तम.
मुमुक्षापेक्षां साधक अधिक उत्तम.
साधकाहून सिद्ध सर्वोत्तम होय.

जसे हाताची पाचही बोटे एकसारखी नाहीत तसेच जगातील सर्व माणसे एकसारख्या विचारांची नाहीत.


काळा, गोरा, खुजा, ऊंच हे माणसाच्या बाबतीत जसे असते. त्याप्रमाणे समर्थांनी जगातील माणसाचे चार विकार सांगितले आहेत.सर्वत्र माणसांचीच गर्दी आहे. या लोकांच्या चार विभागात विभागणी केली आहे.

बद्ध, मुमुक्षु, साधक, सिद्ध असे ते चार प्रकार आहेत.
हा सर्व समास बद्ध लक्षणांचा आहे.

बद्धलक्षणाच्या माणसाला आत्मज्ञान नसते. खरं तर सर्वसामान्य प्रापंचिकाचे वर्णन या समासात दिसते.

मित्रांनो अगदी आपल्याला अवतीभवती दिसणारे सर्व सामान्य लोक या प्रकारात असतात आणि हे समास वाचताना लक्षात येते.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# संत हे भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात

ज्योतिर्मय साहित्य

ज्याला सत्याचे ज्ञान झाले तो सर्वज्ञच बनला; आणि जे या सत्याला धरून राहतात ते संत होत. संत आपल्याला मार्ग दाखवायला तयार असतात, परंतु आपला अभिमान आड येतो, आणि आपण संतांना नावे ठेवतो. एकजण संतांना उद्देशून म्हणाला, ''तुम्ही आमचे नुकसान करता; अपकार करणाऱ्यावरही उपकार करायला सांगून आम्हांला मेषपात्र करता.'' वास्तविक, आपल्या संतांनी कर्मांचा ढीग पाडला आहे, पण त्यांच्या आणि आपल्या कर्मांमध्ये फरक आहे. 'राम कर्ता' या भावनेने त्यांनी कर्म केले; आपण 'मी'पणाने करतो, म्हणून कर्म आपल्याला बंधनकारक बनते. संतांची कामगिरी कुणाला दिसत नाही; आणि आमची फक्त दिसण्यापुरतीच असते, त्यामुळे ती पुरी पडत नाही !

एखादा पुष्कळ ज्ञानी झाला, पण ते ज्ञान जर वृत्तीत उतरले नाही तर त्याचा काय उपयोग? जगाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जो सुखदुःखाच्या जाळ्यात सापडला नाही त्याच्याकडे जावे. तो साक्षित्वाने राहून जगापासून अलिप्तच राहतो. कर्म करूनही तो अलिप्त राहतो. आपण मात्र सुखदुःखात गुरफटून जातो. संताचे अंतःकरण शुद्ध असल्यामुळे त्याची शिव्यांची भाषासुद्धा न बोचणारी, किंबहुना आशीर्वादरूपच ठरते. सत्पुरुष काही विद्वान् नसतात. अती विद्वान् मनुष्य कोणी सत्पुरुष झालेला ऐकिवात नाही. कुणी आठव्या वर्षीच घरातून निघून जातो, तर कुणी लग्नातून पळून जातो, तर कुणाला लिहायला-वाचायलाही येत नाही, असे लोक सत्पुरुष झालेले आढळतात. संतांनी देह सोडल्यावर सुद्धा लोकांना त्यांचे अस्तित्व भासते.

लहान मूल बाहेर खेळत असते, परंतु मध्येच त्याला आईची आठवण होऊन तिच्याकडे धावते. याचा अर्थ असा की, मुलाला आईचे सूक्ष्म स्मरण सतत असते. तसा भगवंताचा चटका, तशी त्याच्या अस्तित्वाची जाणीव, तशी त्याची निष्ठा, आपल्याजवळ पाहिजे. भगवंताची अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो. त्या स्थितीत त्याला कुणी संत भेटला की तो निवांत होतो. संत हे खरोखर आईसारखे आहेत. ते आपल्याला भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात. सर्व जगावर संतांचे उपकार आहेत. त्यांनी परमात्म्याला सगुणात आणले आणि तो आपल्याला सुसेव्य केला; परमात्म्याला आपलासा करून घ्यायला नामस्मरण हे सोपे साधन दिले; एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी असे सोपे सद्ग्रंथ निर्माण केले; आणि यथाशक्ती अन्नदान करणे हेच कलियुगात उत्तम साधन आहे असे सांगितले. या चार गोष्टी आचरणात आणायचा प्रयत्न ज्याने केला, त्याला काही कमी पडणार नाही; नेहमी समाधानच राहील.

***

॥ संत महात्म्य ॥
लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# पाप,पुण्य टाळता येते का?

ज्योतिर्मय साहित्य

कर्मा वरी कर्म विशेष वाढे/ विकर्म त्यात म्हणणे पडे/
जेथ कर्म रिघो न शके पुढे/ अकर्म चोखडे या नाव// नाथ भागवत जेव्हा एका कर्मातून दुसरे कर्म ,दुसऱ्यातून तिसरे, अशी जी कर्माची वाढ होते, तिलाच विकर्म म्हणतात पण जेथे कर्माची वाढ खुंटते त्याला अकर्म हे यथार्थ नाव आहे.

जे कर्मा वेगळे सर्वांगे/ जेथ कर्म लावता ही न लगे/
जे नव्हे कर्मठा जेणे/ ते जाण सवेगे अकर्म

जे सर्वोपरी कर्माहून वेगळे.ज्याला कर्म लावू गेले तरीसुद्धा लागत नाही. जे कर्मठा जोगे नव्हे. तेच खरोखर अकर्म होय.

विकर्म किती संकटात टाकणारे आहे यासाठी नाथ माऊली सांगतात.

विधी निषेध जोड पाडे /जेथ विशेष कर्म वाढे/
विकर्म त्यात म्हणणे घडे/ थोर साकडे पै याचे.

विधी निषेधाची पर्वा न करता जेथे विशेष कर्म वाढते, त्याला विकर्म असे म्हणतात. हे मोठे संकटात घालणारे आहे.

विकर्म एक घडून तेवढ्यापुरते थांबले असे न होता त्यातून दुसरे त्यातून तिसरे अशी कधी न संपणारी मालिका सुरू होते. त्यामुळे विकर्मा पासून दूर राहावे हे संकट कारक आहे. जन्म मृत्यूच्या फेऱ्याला हे कारणीभूत आहे, हे आपल्या लक्षात येते.

कर्म सर्व साधारण/ तेची विकाराते पावले जाणं /
उठिले विधी निषेध दारूण/ विकर्म जाणते म्हणिपे//

सर्वसाधारण कर्म असते तेच विकृत होऊन त्यात मोठ मोठाले विधी निषेध उत्पन्न झाले म्हणजे त्याला विकर्म असे म्हणतात.

आता आपण निशिद्ध कर्म कोणते तेही पाहू

जे विधीसी नातुडे /ते निषेधाचे अंग चढे/
करिता चुके ठाके विकल पडे/ तेही रोकडे निषिद्धच//

जे विधीला अनुसरून होत नाही ते निषेधाकडे वळते, हे उघड आहे. जे आचरित असता चूक होते, किंवा त्यात खंड पडतो. तेही खरोखरच निषिद्ध कर्मच होय.

अविद्या युक्त जीव परम/ त्यासी नित्य क्रिया तेच कर्म/
नित्य न करणे ते अकर्म/ विकर्म ते निशिद्ध//

जीव हा परम अविद्यायुक्त जीव परम/
त्यासी नित्य क्रिया तेची कर्म/
नित्य न करणे तेच अकर्म/ विकर्म ते निषिद्ध //
ऐसी कर्मा कर्मा विकर्म त्रिपुटी/
भेदान रूपे वाढली सृष्टी/
तेच गुण दोष बुद्धीच्या पोटी/ भेद दृष्टी वाढती//

अशा कर्म, वीकर्म, आणि निषिद्ध कर्म यांच्या संयोगातून, मिश्रणातून अनेकविध कर्मे निपजतात त्यातून सृष्टीचा विकास होतो. आणि त्रिगुणांच्या दोषामुळे बुद्धीच्या पोटी भेददृष्टी वाढते. विकर्मातून अनेक विध कर्मांचा जन्म होतो. ही कर्मे फेडण्यासाठी पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. आणि नव्या जन्मात ही पुन्हा कर्मे घडतात. आणि जन्म मृत्यूचा हा फेरा अविरत चालू राहतो.

हा जन्म मृत्यूचा फेरा संपवायचा असेल तर संचित, प्रारब्ध व क्रियमान अशी सर्व कर्मे संपवणे गरजेचे असते. ज्यावेळेस सद्गुरू साधकाची कुंडलिनी जागृत करतात, त्यावेळेस त्याचा साधना प्रवास सुरू होतो. उत्तम भावावस्था व भरपूर साधना यातून त्याची प्राण गती जी विषयाकडे वळलेली असते ती वर उलट्या दिशेने म्हणजे सुशुमनेद्वारे सहस्त्रार चक्राकडे सरकारला लागते. शरीरातील पंचप्राण एकत्रित घेऊन योगग्नी पेटतो. हा योगग्नी जेव्हा बुद्धीमध्ये व्यापला जातो व बुद्धी विषयाकडे वळलेली न राहता आत्म्याकडे दृढतेने वळते त्यावेळेस या योगग्नीस ब्रह्मगणी किंवा ज्ञानाग्नी असे म्हणतात. या ज्ञानाग्नी मुळे कर्म बीजे समूळ जळून नष्ट होतात. असे झाले की साधकाला सिद्ध अवस्था प्राप्त होते व पुढे त्यास ही कोणतीच कर्मे शिल्लक न राहिल्याने मुक्ती मिळते. त्याचा जन्म मृत्यूचा फेरा संपतो.

(क्रमशः)



॥ निरूपण ॥
ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**सर्वाऽधारा शिवा गौरी काली लक्ष्मीः सरस्वती।**
**सद्भक्तेश्वनुरागस्तु विशेषेण प्रकीर्तितः।।४५।।**

शिवा, गौरी, काली, लक्ष्मी, सरस्वती या शक्ती सर्वांच्या आधारभूत आहेत. सद्भक्तांवरील त्यांचा स्नेह तर विशेष प्रसिध्द आहे.

**मदीयं न हि कर्तृत्वं न सामर्थ्यं न धीः पुनः।**
**एषा कृपा हि तस्या यल्लेखयति मया यथा।।४६।।**

मी जसे लिहीतो, हे माझे कर्तृत्व नाही. तसे माझे सामर्थ्य नाही. आणि बुद्धीही नाही. ही तिचीच कृपा आहे.

**समीरणस्य गन्धः कः स तु पुष्पस्य सर्वथा।**
**प्रकाश:शशिनो नैव भास्करस्य हि सर्वथा।।४७।।**

वाऱ्याचा कसला सुगंध? तो तर फुलाचाच! प्रकाश चंद्राचा नाही, तो तर सूर्याचाच!

**यल्लिखितं मया माये मनसिजं हि तत् पदम्।**
**तस्सर्वमर्पयामीति तव तुभ्यं महेश्वरी।।४८।।**

हे माये, मनातील जे काही माझेकडून लिहून घेतलेस, ते सर्व हे महेश्वरी, तुझे तुलाच समर्पित करतो.



आरोग्य संजीवनी

# गावठी तांदळाच्या पेजेचे आरोग्यदायी फायदे

ज्योतिर्मय साहित्य

१) तांदळाच्या पेजेत काळे मीठ टाकून प्यायल्यास भूक वाढते.

२) तांदळाच्या पेजेत मध मिसळून प्यायल्याने एनर्जि मिळते. थकवा दूर होतो.

३) तांदळाची पेज व गूळ एकत्रित करून प्यायल्यास रक्ताची कमतरता दूर होते.

४) तांदळाच्या पेजेत लिंबूचा रस टाकल्याने पोटाच्या समस्या दूर होतात.

५) तांदळाच्या पेजेत दही टाकून प्यायल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो.

६) केळे व तांदळाची पेज एकत्र करून प्यायल्याने जुलाब बंद होतात.

७) तांदळाच्या पेजेत तूप मिसळून प्यायल्याने वजन वाढते.

८) तांदळाच्या पेजेत मीठ व जीरे मिसळून प्यायल्यास डायजेशन सुधारते.

९) भाताच्या पेजेत कार्बोहायड्रेटस् चे प्रमाण अधिक असते, त्यामुळे उर्जा मिळते, बाहेर जातांना पिऊन जावे, दिवसभर ताजेतवाने वाटते.

१०) वायरल संसर्गाने उलट्या, मळमळ होत असेल तर जेवणाऐवजी पेज घ्यावी, आजारपणात आलेली कमजोरी दूर होते.

११) उच्च रक्तदाब कमी होतो. तांदळाचे पाणी घेतल्यास हाय ब्लडप्रेशर कमी होते. कारण यात पोटॅशिअम मुबलक प्रमाणात असते.

१२) तांदळच्या पाण्याने चेहरा धुतल्यास तजेलदार, मुलायम होतो, काळे डाग निघून जातात.

१३) केसांकरता उत्तम टॉनिक आहे. याच्या पाण्याने केस धुतल्यास कोंडा निघून जातो, केस रेशमी, चमकदार, व मजबूत होतात. रूक्षता निघून जाते दुतोंडी केसांची समस्या दूर होते, कारण यात मुबलक विटामिन, मिनरल असतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

१४) तांदळाच्या पाण्याचे नियमित सेवन केल्यास कॅंसरच्या पेशी आटोक्यात राहतात.

१५) तांदळाच्या पाण्यात फायबर भरपूर प्रमाणात असल्याने मेटाबॉलिज्म वाढते, पचनक्रिया सुरळित चालते. त्यामुळे आरोग्य चांगले राहते.

१६) डायेरियात डिहायड्रेशन होते अश्या वेळी तांदळाची पातळ पेज प्यायला द्यावी. ताकद येते.

१७) सर्दी, पडसे, ताप, वायरल इंनफेक्शन मध्ये तांदळाचे पाणी प्यायल्यास प्रतिकारशक्ति वाढून हे आजार दूर होतात.

गावठी तांदळा ची पेज खूप च पौष्टिक आहे , एकेकाळी गोवा व कोकणात सकाळ च्या न्याहरी सोबत घेतली जायची.

गावठी तांदूळ गोव्यात- कोकणात मिळतो च तसेच आता बाजार पेठेतही सहज शक्य झाला आहे

पूर्वी आजारी पेशन्टना गावठी तांदळाची पेज दिली जायची त्या मागची कारणे पोस्ट मध्ये मांडली आहेतच.

॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

राम शब्दातील सामर्थ्य आपण समजलो पाहिजे त्याचे नाम आपण जप करावा. राम परमात्माशे पण वाल्मिकीन मुद्दाम म्हणून एक नर म्हणून केली कारण त्याचे जीवन आपल्या विचार धारेशी आपण पडताळणी करावी आपणास राम विषयी स्नेह निर्माण व्हावा म्हणून हे आहे. रामाचे सद्गुण आपल्यात ते यावेत म्हणून आपण प्रयत्नशील रहावे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

वाल्मिकींनी रामायणात प्रभु श्री रामाचे चरीत्र हे एखाद्या गृहस्थाश्रमी व्यक्तीचे चरित्र असावे असे ते प्रदर्शित केले आहे. त्यांच्या जीवन संबंधाने जो जो विचार झाला तो तो आपल्या कल्याणा साठी आहे.मनुष्य म्हणून आपण जन्माला आलो हे आपले प्रारब्ध आहे. तसे आम्ही जन्मलो प्रारब्धाने पण त्याचा बाऊ ही करणे नको. आपण जगात येऊन आपल्या कल्याणार्थ सर्व शक्य ते प्रयत्न आपण केले पाहिजेत. आपल्या जीवनात सुख दुःखाचे प्रसंग हे येतच असतात.अशा प्रसंगात आपण कसे वागावे?आपण आनंदाने हुरळून जाऊ नये तसेच दुःखाने कोलमडू नये हे या कथेतून आपण पाहू शकतो.

मारुती राय लंकेस जातात. सीता मातेचा शोध घेतात. लंका पेटवून येतात. जिथे युद्ध होणार त्या जागेचे अवलोकन ते करतात. ते पून्हा सीतेला भेटतात. सीता माता त्यांचे जवळ शंका उपस्थीत करते की राम एव्हढा मोठा समुद्र कसा ओलांडून येतील? हनुमान त्यांचे आत्मबळ वाढवितात. राम प्रभू समर्थ आहेत, ते नक्कीच यातून मार्ग काढतील. मी ही त्यांना उचलून आणू शकतो. अशा रीतीने त्यांनी सीतेचे मनोबल वाढविले.

(क्रमशः)

# श्रीयश टेक्निकल कॅम्पसमध्ये एनआयपीएम स्टुडन्ट चॅप्टरचे उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच श्रीयश व्यवस्थापन अध्ययन व संशोधन महाविद्यालय येथे नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पेर्सोनेल मॅनेजमेंट (एन.आय. पी.एम.) विद्यार्थ्यांच्या शाखेचे भव्य उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे स्वागत, पारंपरिक दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या कार्यकारिणी सदस्यांची घोषणा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शाखेच्या अध्यक्षा कु. रक्षंदा चक्रे यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच विद्यार्थी सर्व उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतील, अशी ग्वाही दिली. उपाध्यक्ष तसेच टून्व्हू वॉर्नर इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडचे व्यवस्थापक समीर करुरकर यांनी शाखेची उद्दिष्टे व विद्यार्थ्यांना होणारे फायदे सविस्तर सांगितले. छत्रपती संभाजीनगर एन.आय. पी.एम. शाखेचे अध्यक्ष व लॉयल इन्फोसर्विसेसचे संचालक पुनीत धिंग्रा यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाचे महत्त्व स्पष्ट केले व त्यात एन.आय. पी.एम. कसा उपयोगी ठरतो यावर मार्गदर्शन केले. तर एन.आय.पी.एम. चे



राष्ट्रीय परिषद सदस्य व निडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया लिमिटेडचे मुख्य मानव संसाधन अधिकारी अनुराग कल्याणी यांनी विद्यार्थ्यांना करिअरमध्ये यशस्वी होण्याचा कानमंत्र देत, सखोल मार्गदर्शन केले.

यानंतर श्रीयश प्रतिष्ठानचे केंद्रीय प्रशिक्षण व रोजगार विभागप्रमुख प्रा. अनिल पालवे तसेच व्यवस्थापन महाविद्यालयाचे संचालक डॉ. सचिन वानखेडे यांनी एन.आय.पी.एम. टीमचे उद्घाटन सोहळ्यासाठी व विद्यार्थ्यांना दिलेल्या पाठिंब्यासाठी मनःपूर्वक आभार मानले.

उद्घाटन सोहळ्यानंतर ‘‘कॅम्पस टू कॉर्पोरेट : व्यावसायिक रूपांतरणाची तयारी’’ या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. या चर्चासत्रात एन. आय. पी. एम. कार्यकारी समिती सदस्यांसोबत ग्राइंडमास्टरचे वरिष्ठ मानव संसाधन व्यवस्थापक आणि स्टुडन्ट चॅप्टरचे अध्यक्ष संदीप पिंपळे, मेटलमन ऑटोचे सहाय्यक महाव्यवस्थापक विजय साळवे तसेच एंड्युरन्स टेक्नॉलॉजीजचे क्लस्टर मानव संसाधन प्रमुख साकिब सिद्दीकी सहभागी झाले. उद्योगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये, कार्यसंस्कृतीचे महत्त्व, वाचनाची सवय, चिंतनशील विचारसरणी, व्यक्तिमत्व विकास, सुसंस्कारित वर्तन तसेच प्रशिक्षण व प्रकल्पांचे महत्त्व यांवर सविस्तर चर्चा झाली.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करण्यासाठी एन. आय.पी.एम. व संस्थेमध्ये सामंजस्य करार (एम.ओ.यू.) करण्यात आला. या प्रसंगी श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एम. पाटील, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. पी.एम. अर्धापूरकर, विभागप्रमुख, प्राध्यापक व एम.बी.ए. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन एम.बी.ए. विद्यार्थिनी कु. समीक्षा भोपालेंनी केले.




# लायन्स क्लब सेंट्रल कामठी द्वारा प्रा डॉ सुधीर अग्रवाल सन्मानित

**ज्योतिर्मय साहित्य**

नागपूर येथील दर्शन टॉवर्स सी ए रोड गांधी बाग येथे लायन्स क्लब सेंट्रल कामठी ची जनरल बॉडी मीटिंग मध्ये आयोजित कार्यक्रमात कामठी येथील शिक्षण सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक व प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी मंचावर लायन्स क्लब सेंट्रल कामठीचे नवनियुक्त अध्यक्षा प्रा प्रवीण हांडा,सचिव श्री अजय श्रीवास्तव , कोषाध्यक्ष श्री प्रमेंद्र वाहिले मंचावर उपस्थित होते. पोरवाल कॉलेज कामठी येथील उपप्राचार्य डॉ.सुधीर अग्रवाल यांना त्यांच्या शैक्षणिक सामाजिक व महाविद्यालयीन विकासाच्या संदर्भात पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा.डॉ सुधीर अग्रवाल गेल्या.२८ वर्षापासून पोरवाल कनिष्ठ महाविद्यालय कामठी येथे कार्यरत आहे.मागील तीन वर्षापासून ते उपप्राचार्य पदी असून आपल्या कार्यालयीन कामाव्यतिरिक्त ते पत्रकारित व सामाजिक कार्य करतात.




# भारतीयत्व रुजवणे प्रसार माध्यमांसाठी महत्त्वाचे – प्रा. संजय तांबट

## पंढरपूरात माध्यम संवाद परिषदेचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पंढरपूर –** ‘‘भारतीयत्व ही संकल्पना समाजात दृढ झाली, तर राष्ट्रीय सुरक्षा आपोआप निर्माण होईल. यासाठी प्रसार माध्यमांनी महत्त्वाची भूमिका बजावावी,‘‘ असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. संजय तांबट यांनी व्यक्त केले. शेजारच्या देशातील राजकीय अस्थिरता पाहता, शब्दांचा शस्त्राप्रमाणे कसा वापर होतो हे लक्षात घेऊन माध्यमांनी देशाच्या सुरक्षेशी संबंधित प्रश्न जनतेसमोर आणणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

विश्व संवाद केंद्र, पुणे आणि विठाई बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्था, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अरिहंत पब्लिक स्कूल, पंढरपूर येथे झालेल्या माध्यम संवाद परिषदेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर स्वेरीचे सचिव डॉ. बी. पी. रोंगे, अरिहंत पब्लिक स्कूलचे सचिव उज्वलभई दोशी, कार्यशाळा मार्गदर्शिका प्रांजली देशपांडे आणि माध्यम संवादचे नरेंद्र जोशी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. या परिषदेत झालेल्या एआय कार्यशाळेत प्रांजली देशपांडे यांनी पत्रिकारितेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कसा करावा, त्याचे फायदे-तोटे, शक्यता आणि विश्वासार्हता यांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

या माध्यम परिषद व कार्यशाळेसाठी पंढरपूरसह माढा, करमाळा, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा तालुक्यांतील बातमीदार उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत ॲड. महेश वाळुजकर, परिचय डॉ. सचिन लादे, प्रास्ताविक नरेंद्र जोशी, सूत्रसंचालन सोमनाथ गायकवाड यांनी केले, तर आभार स्वानंद कुलकर्णी यांनी मानले.

# हिंदू धर्मात स्त्रीला मानाचे स्थान – प्रा. चंद्रकला पाडिया

## हिंदुत्वाच्या प्रकाशात स्त्री चिंतन पुस्तकाचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** पाश्चात्त्य विचारांच्या प्रभावामुळे आपण आपल्या संस्कृतीची उपेक्षा करत आहोत आणि प्रत्येक गोष्ट पाश्चात्त्य दृष्टीने पाहण्याची सवय आपल्याला लागली आहे, असे महत्त्वपूर्ण मत बनारस हिंदू विश्व विद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. चंद्रकला पाडिया यांनी व्यक्त केले. सुनीला सोवनी लिखित हिंदुत्वाच्या प्रकाशात स्त्री चिंतन या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त आयोजित भारतीय परंपरेतील स्त्री चिंतन या अभ्याससत्रात त्या बोलत होत्या.

दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र, बाया कर्वे स्त्री अभ्यास व संशोधन केंद्र आणि भारतीय विचार साधना पुणे प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे सत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉ. पाडिया यांनी पाश्चात्त्य तत्त्वज्ञ आणि प्राचीन भारतीय दार्शनिक यांच्या विचारांमधील फरक स्पष्ट केला. त्यांनी सांगितले की, ‘‘हिंदू धर्मात स्त्रीला जे मानाचे स्थान आहे, ते इतर कोणत्याही संस्कृतीमध्ये नाही. आदि शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे, शिव हा शक्तीशिवाय शव आहे, हेच याचे द्योतक आहे.’’

दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता भाविसा सभागृहात झालेल्या या प्रकाशन सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणून राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी उपस्थित होत्या. या प्रसंगी बोलताना त्या म्हणाल्या की, ‘‘संपूर्ण जगातील सर्वात प्राचीन तरीही नित्यनूतन असा हिंदू धर्म आहे. स्त्री-पुरुष



समानतेचा विचार करताना पुरुषांशी स्पर्धा करण्याऐवजी प्रत्येकाने आपल्यामधील क्षमतेचा उच्चांक गाठावा.’’ कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. चंद्रकला पाडिया यांनी, ‘‘विद्वान त्या व्यक्तीला म्हणतात, ज्याला आपल्या अज्ञानाचे ज्ञान असते,’’ असे सांगत अलीकडे सुरू झालेल्या भारतीय ज्ञान परंपरेच्या अभ्यासाचे कौतुक केले. या प्रसंगी लेखिका सुनीला सोवनी यांनी मनोगत व्यक्त केले, तर ‘भाविसा’चे अध्यक्ष डॉ. गिरीश आफळे यांनी प्रास्ताविक केले. समृद्धी पानसे यांनी सूत्रसंचालन केले. अनेक अभ्यासक आणि वाचक या सोहळ्याला उपस्थित होते.

# खर्चाला आळा घालून मायेचा उपक्रम

**ज्योतिर्मय साहित्य**


**रहिमतपूर –** रहिमतपूर नगरीतील एक सामाजिक संस्था माँ साहेब युथ फाउँडेशन रहिमतपूर ही सतत सामाजिक उपक्रमात, कार्यक्रमात कार्यरत असणारी संस्था, गणेश उत्सव मध्ये अनावश्यक खर्च टाळून एक सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी मागच्या वर्षी प्रमाणे या ही वर्षी पिंपरी येथील स्नेह आधार फाउँडेशन अर्थात आनंदाश्रम या ठिकाणी सदर संस्थेअंतर्गत अन्नदान करण्यात आले असून एक आधाराचे नाते जोडले गेले. माँ साहेब युथ फाऊंडेशन रहिमतपूर चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व नवतरुण गणेश उत्सव मंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते.












# देव तारी त्याला कोण मारी

**ज्योतिर्मय साहित्य**

माननीय एस एम देशमुख सर तुम्ही संसारावर तुळशीपत्र ठेवून पत्रकारांसाठी दिवसरात्र झटुन अतिशय पोटतिडकीने, प्रामाणिकपणे खूप महान कार्य केलेले आहे माननीय एस एमदेशमुख सर तुम्ही हजारो गरजू पत्रकारांना केलेल्या मदतीमुळे व स्वर्गीय झालेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांना केलेल्या मदतीमुळे हजारो कुटुंबीयांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत पत्रकारांसाठी त्यामुळे एवढ्या मोठ्या अपघातात, एवढ्या मोठ्या संकटात तुमच्या केसालाही धक्का लागला नाही व व यापुढेही लागणार नाही.

माननीय एस एम देशमुख सर गेल्या ३०-३५ वर्षापासून आपण महाराष्ट्रातील हजारो गरजू गरीब गरजवंत पत्रकारांच्या विविध समस्या सोडवण्या साठी व महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आपण आपल्या तुम्ही तुमच्या सुखी संसारावर तुळशीपत्र ठेवून संपूर्ण महाराष्ट्रभर पत्रकारांचे विविध समस्या विविध प्रश्न मांडण्यासाठी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून संपूर्ण महाराष्ट्रभर दिवसभर दौरे करत दिवस रात्र अक्षरच्या जीवाचे रान करून फिरत राहिलात व आजही या वयात दिवस रात्र फिरत आहात व पत्रकारांच्या विविध समस्या प्रश्न सोडवण्यासाठी सतत दिवस-रात्र अतिशय निस्वार्थपणे काम करत होता व आज आराम करायच्या दिवसात आजही या उतार वयात काम करत आहात महाराष्ट्रात कुठेही पत्रकारावर अन्याय झाला पत्रकारावर हल्ला झाला सर्वात पहिला आवाज हा माननीय एस एम देशमुख सर उठवतात व पत्रकारांना ताबडतोब कशी मदत मिळेल यासाठी प्रयत्न करत असतात यासाठी वारंवार सरकारशी प्रशासनाशी नेहमी भांडत असतात महाराष्ट्रात कुठेही एखाद्या

**✍ मोहन चौकेकर**
**मराठी पत्रकार परिषद**
**बुलढाणा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख**

पत्रकाराचे आजारी पडून किंवा अपघाताने किंवा हल्ला होऊन निधन झाले तर सर्वात प्रथम एस एम देशमुख स्वतः व आपल्या सर्वांच्या मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सर्वात प्रथम व नेहमी पत्रकारांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सवरण्यासाठी आर्थिक मदत करत असतात व आणखी काही वस्तू स्वरूपात नेहमी मदत करत असतात त्यामुळे महाराष्ट्रातील हजारो पत्रकार स्वर्गीय झालेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांचे व संकटात सापडलेल्या कुटुंबियांचे आशीर्वाद नेहमी माननीय एस एम देशमुख सरांच्या पाठीशी असतात व नेहमी राहतील माननीय एस एम. देशमुख सर एवढ्या मोठ्या अपघातात तुम्ही स्वतः बसवलात व अशा घाबरून जायच्या वेळी संकटाच्या प्रसंगी आपले संकट विसरुन तुम्ही या अपघातात सापडलेल्या प्रवाशांना नागरिकांना गाडीतून बाहेर काढण्यासाठी जी मदत केली व त्यांना वैद्यकीय मदत मिळावी यासाठी १०८ या सरकारी मदत करणाऱ्या गाडीला बोलवुन मिळवण्यासाठी जी माणुसकी दाखवली यामधून तुमचे अतिशय चांगले असणारे माणुसकीबाज व्यक्तिमत्व पुन्हा एकदा दिसून येते. माननीय देशमुख सर तुमच्या या महान कार्याला जेवढे वंदन करावे तेवढे कमीच आहे. त्यामुळे पुन्हा एकदा म्हणतो की माननिय एस एम देशमुख सर तुम्ही पत्रकारांसाठी दिवसरात्र झटुन अतिशय पोटतिडकीने, प्रामाणिकपणे खूप महान कार्य केलेले आहे माननीय एस एमदेशमुख सर तुम्ही हजारो गरजू पत्रकारांना केलेल्या मदतीमुळे व स्वर्गीय झालेल्या पत्रकारांच्या कुटुंबियांना केलेल्या मदतीमुळे हजारो कुटुंबीयांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत पत्रकारांसाठी त्यामुळे एवढ्या मोठ्या अपघातात , एवढ्या मोठ्या संकटात तुमच्या केसालाही धक्का लागला नाही व व यापुढेही लागणार नाही

***

# अनेकांत : अस्तित्व हेच तत्व

ज्योतिर्मय साहित्य

मनुष्य अस्तित्वात आला तेव्हांपासून विचार ही अस्तित्वात आला आहे. विचार हा आचारातून व्यक्त होतो. भाषेची अभिव्यक्ती केव्हा उदयास आली हा प्रश्न वेगळा आहे. मनुष्याच्या अस्तित्वापासून ''काय आहे ?'' हा प्रश्न सतत विद्यमान आहे. हे काय आहे म्हणजेच तत्व किंवा सत्य काय आहे? तत्व आणि सत्य हे शब्द अस्तित्वात येण्यापूर्वी देखील ही जिज्ञासा होती. म्हणून हा प्रश्न अनादिकालीन आहे. विचाराची सुरुवात झाली तोच तत्व आणि सत्य या प्रश्नांचा उगम काळ समजावा.


भगवान महावीरांच्या शिष्य समुदायाचे प्रमुख गौतम गणधर स्वामी यांनी भगवान महावीरांना विचारले, '' किं तत्वम? '' अर्थात भगवान! तत्व काय आहे ? भगवंत म्हणाले, '' उपन्नेइ वा '' उत्पन्न होणे तत्व आहे. उत्पाद हे तत्व आहे. (भगवान महावीरांचा उपदेश शिष्यांनी प्राकृत अर्धमागधी भाषेत जैन आगम ग्रंथांच्या स्वरूपात लिहून ठेवलेला आहे). असे उत्तर ऐकल्यानंतर सहजच प्रश्न उपस्थित होतो की केवळ उत्पन्न होणे हेच तत्व असेल तर सर्वत्र सर्व वस्तू आणि जीवांचे सतत उत्पादन होतच राहील.जागा पुरणार नाही. पदार्थ आणि प्राण्यांनी पृथ्वी भरून जाईल. कुठलाही व्यवहार, असणे सुरळीत होणार नाही.

हे व्यवस्थित समजले नाही म्हणून गौतम गणधर भगवान महावीरांना परत विचारतात,

'' भंते ! किं तत्वम? ''तत्व काय आहे ?. यावेळी महावीर म्हणतात , ''विगमेइ वा'' म्हणजेच नष्ट होणे. परत शंका उत्पन्न झाली, उत्पन्न होणे हे तत्व आहे आणि नष्ट होणे हे देखील तत्त्व आहे तर मग उरणार काय? विद्यमान काय असेल? अस्तित्व काय आहे? वर्तमान काय आहे?

गौतम गणधर स्वामी यांनी भ.महावीरांना पुन्हा एकदा विचारले, ''भंते ! किं तत्वम?'' हे भगवान ! तत्व काय आहे? यावेळी भगवान उत्तरले, ''धुवेइ वा '' अर्थात् ध्रुव असणे, शाश्वत असणे, स्थिर असणे, कायम असणे. भगवंताचे हे उत्तर ऐकल्यानंतर प्रमुख शिष्य गौतम गणधर स्वामी, जे की तत्त्वज्ञानाचे प्रकांड पंडित होते त्यांनी विधान केले की उत्पन्न होणे, नष्ट होणे आणि अस्तित्वामध्ये असणे ही त्रिपदी मिळून तत्व आहे सत्य आहे.

सृष्टी अस्तित्वात होती आणि आहे, प्रलय देखील होतो परंतु अस्तित्व शिल्लक होते. याचाच अर्थ काही शाश्वत आहे काही अशाश्वत आहे. काही नित्य आहे तर काही अनित्य आहे. निर्माण होणे आणि नष्ट होणे ही प्रक्रिया विश्वामध्ये सतत चालू असते. परंतु तरीही एक शाश्वत विद्यमानता मात्र अस्तित्वात राहते. त्यालाच तत्व किंवा सत्य असे म्हणता येईल.



अंध:कार आणि प्रकाश दोन्हीचे अस्तित्व विश्वात आहे. केवळ अंध:कारच अस्तित्वात असता तर प्रकाशाचे नामकरण देखील झाले नसते. म्हणून प्रकाशाचे अस्तित्व देखील अंध:कारावर अवलंबून आहे, अंध:काराचे नष्ट होणे म्हणजेच प्रकाशाचे उदय अस्तित्व. याचाच अर्थ विरोधासह असणे हा मूलभूत सिद्धांत आहे. म्हणजेच विरोधी तत्त्व नसेल तर विधायक तत्व ही नसेल. या वरून असे म्हणता येईल की विरोधी नसेल तर अस्तित्वही असू शकत नाही. चेतनेचे अस्तित्व तेव्हाच आहे जेव्हा की काही अचेतन अस्तित्वात आहे. दोन्हींच्या अस्तित्वासाठी दोघांचे असणे आवश्यक आहे. एका वरून दुसऱ्याचा बोध होतो.

भगवान महावीरांनी या प्रमुख तत्वाचे प्रथम उद्घाटन केले आणि त्याला अनेकांत तत्व म्हणून संबोधित केले. म्हणजेच तत्व, सत्य अनेकांगी आहे एक अंगी नाही.या अनेकांत तत्वाचे प्रमुख सूत्र आहे - सह प्रतीपक्ष. केवळ जो आहे तो पुरेसा नाही, त्याचे विरोधी तत्व हे असायला हवे. संपूर्ण सृष्टी मध्ये, संपूर्ण विश्वामध्ये सर्वत्र अशा विरोधी युगल तत्वांचे, सिद्धांतांचे अस्तित्व आहे. म्हणूनच ज्ञान आहे तर अज्ञान देखील आहे, सुख आहे तर दुःख देखील आहे, निद्रा आहे तर जागरण देखील आहे, जीवन आहे तर मृत्यू देखील आहे, शुभ आहे तर अशुभ देखील आहे, उच्च आहे तर नीच देखील आहे, लाभ आहे तर अडथळा देखील आहे. शक्ती आहे तर अशक्तता देखील आहे. प्रेम आहे तर द्वेष देखील आहे, दया आहे तर क्रूरता देखील आहे.

अज्ञान संपूनच ज्ञान उदयास येते, दुःख संपूनच सुखाचा उदय होतो, निद्रा संपूनच जागृती उत्पन्न होते, तसेच जीवन संपून मृत्यू येतो, निचता संपल्यावर उच्चता उदयास येते, अडथळा संपल्यावर लाभ होतो. अशक्तपणा नष्ट झाल्यास शक्ती उत्पन्न होते. या सर्व प्रक्रिये मध्ये वस्तू किंवा पदार्थ आणि जीव किंवा चैतन्य यांचे अस्तित्व मात्र स्थिर शाश्वत राहते.

अस्तित्व जीव असो अथवा अजीव, तिथे विरोधी असणे स्वाभाविक आहे. विरोधी युगलांचे अस्तित्व नैसर्गिक आहे. त्यांचे सह-अस्तित्व देखील नैसर्गिक आणि स्वाभाविकच आहे. हा नियम कोणीही बनवलेला नाही. तो स्वयंभू आहे. जसे की अंधकार आणि प्रकाश याला कोणीही बनवलेले नाही. जीवन आणि मृत्यू याला कोणीही बनवलेले नाही. कोणताही महापुरुष,मनस्वी, ऋषी, तीर्थंकर, महर्षी,आचार्य हे नियम बनवत नाहीत. मात्र महापुरुष याची व्याख्या करतात विश्लेषण करतात, या प्राकृतिक नियमात लपलेल्या रहस्य आणि सिद्धांताचे उद्घाटन महर्षी करतात, सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत सांगतात. नैसर्गिक आणि प्राकृतिक नियमांचे सर्जन करणे हे कोणाच्याही हातात नाही. तत्त्ववेत्ता किंवा संन्यस्त महापुरुष साधारणपणे आचार व्यवहाराचे नियम बनवतात. परंतु पृथ्वीवरील कोणत्याही व्यक्तीमध्ये इतकी क्षमता नाही की तो निसर्गाचे नियम बनवेल. हे नियम स्वाभाविक असतात.



बलराज संघई
छत्रपती संभाजीनगर

या स्वाभाविक नियमांमध्ये पक्ष आणि प्रतिपक्ष यांचे अस्तित्व आहे. जीव अजीव आहे, पृथ्वी आणि अवकाश आहे. काळाच्या प्रवाहातनुसार यांच्यामध्ये सतत नियमाने परिवर्तन होते. काहीतरी उत्पन्न होते काहीतरी नष्ट होते. मात्र काहीतरी स्थिर असते आणि तेच तत्त्व किंवा सत्य ते मला वाटते.

# इंजिनियर्स डे : राष्ट्रनिर्मितीत अभियंत्यांचा मोलाचा ठसा

ज्योतिर्मय साहित्य

विद्युत क्षेत्रात तसेच प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या माझ्या सर्व अभियंता बंधू-भगिनींना ''अभियंता दिनाच्या'' हार्दिक शुभेच्छा.. १५ सप्टेंबर हा दिवस अभियंत्यांचे दैवत डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिन. १९६८ पासून संपूर्ण भारतभर हा दिवस अभियंता दिन (इंजिनिअर्स डे) म्हणून साजरा होतो. सेवानिवृत्तीनंतरही तब्बल ५५ वर्षे जनतेच्या सेवेत आयुष्य वेचणारी व्यक्ती ही खऱ्या अर्थाने भारतरत्न असते. साऱ्या अभियंत्यांचे दैवत, आधुनिक भारताचे रचनाकार सर, भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या हे त्यापैकीच एक होते. तत्कालीन पाकिस्तानातील सिंध प्रांतातील सक्कर येथील पाणीटंचाईचा प्रश्न त्यांनी कल्पकतेने सोडवला आणि जगभर भारतीय अभियंतेपणाची दखल घेतली गेली. १८८४ मध्ये इंग्रज सरकारने त्यांना नाशिक विभागात अभियंता म्हणून नेमले, मात्र १९०७ मध्ये वयाच्या अवघ्या ४७ व्या वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेऊन ते समाजकार्यास वाहून घेतले. स्वतःच्या निवृत्ती वेतनातून आपल्या गरजेपुरते पैसे



वापरून उर्वरित पैसा गरीब मुलांच्या शिक्षणासाठी ते देत असत.

शिक्षणात आलेल्या संघर्षामुळेच इतरांवर अशी वेळ येऊ नये या भावनेतून त्यांनी गरीब विद्यार्थ्यांना मदत केली. त्यांच्या कृतीतून एक संवेदनशील व्यक्तिमत्त्व दिसून येते. निवृत्तीनंतर स्थापत्यशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी ते युरोपला गेले. पण निजामाच्या आदेशावर भारतात परत येऊन हैदराबादेतील मुसा नदीच्या पुराच्या पाण्यावर कायमस्वरूपी तोडगा काढला.

म्हैसूरचे मुख्य अभियंता झाल्यावर त्यांनी कावेरी नदीवर कृष्णसागर धरण उभारले. या पाण्यावर त्यांनी वीज निर्मिती केली आणि म्हैसूरचा राजवाडा व वृंदावन गार्डन उजळले. पुढे ते म्हैसूर संस्थानचे दिवाण झाले. सहा वर्षांतच म्हैसूर विद्यापीठ, पोलाद, सिमेंट, रेशीम, चंदन, तेल, साबण यांचे कारखाने उभारले. शेती, उद्योग, शिक्षण या क्षेत्रात संस्थानने नेत्रदीपक कामगिरी केली.

मुंबई औद्योगिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, मुंबई महानगरपालिका काटकसर समितीचे अध्यक्ष, भारतीय अर्थविषयक समितीचे अध्यक्ष, नवी दिल्ली राजधानी समितीचे सल्लागार अशी विविध पदे त्यांनी भूषविली. पुण्याजवळील खडकवासला जलाशय तसेच हैदराबाद शहर उभारण्यात त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

इंग्रज सरकारने त्यांना सर हा किताब दिला, तर देशातील प्रमुख विद्यापीठांनी डिलीट पदवी देऊन सन्मानित केले. १९५५ मध्ये भारत सरकारने त्यांना भारतरत्न देऊन गौरविले.


सीमा गाडेकर
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी,
छत्रपती संभाजीनगर. 94 23 17 23 05

त्यांनी दिलेला तरुणांसाठीचा ''झिजा पण गंजू नका'' हा प्रेरणामंत्र आजही तितकाच प्रभावी आहे. वयाची नव्वदी ओलांडल्यावरही त्यांचा उत्साह तरुणांना लाजवणारा होता.

१५ सप्टेंबर १९६१ रोजी भारतभर त्यांचा जन्मशताब्दी महोत्सव साजरा झाला. पंडित नेहरूंनी त्यांच्याबद्दल ''निष्ठावान, चारित्र्यवान आणि विशाल दृष्टिकोन असलेले अभियंता'' असे उद्गार काढले.

१४ एप्रिल १९६२ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली आणि एक कल्पक अभियंता, वैज्ञानिक व राष्ट्रनिर्माते आपल्यातून निघून गेले.

१९६८ पासून त्यांच्या जन्मदिनानिमित्त भारतभर अभियंता दिन साजरा केला जातो.

आज त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करताना माझ्या भारत देशातील सर्व अभियंता बंधू-भगिनींना इंजिनियर्स डेच्या आभाळभर शुभेच्छा!



# टिळक शिक्षण महाविद्यालयात संस्कृत दिन संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – शिक्षण प्रसारक मंडळी संचलित टिळक शिक्षण महाविद्यालय येथे नुकतेच संस्कृत दिनानिमित्त शिक्षकांचे आरोग्य आणि आयुर्वेद- एक परिचय या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

संस्कृताध्यापिका सौ. नीरजा बेलसरे या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तर प्रा. डॉ. सुवर्णा शिकारे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. चन्द्रहास सोनपेठकर यांनी केले. पियुषा नाईक, विठ्ठल मुटकुळे, रिया सहस्त्रबुद्धे यांनी मनोगत व्यक्त केले. अमृता खेर यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. दर्शन बागूल यांनी आभार मानले. सूत्रसंचालन कल्याणी भोयर यांनी केले. कार्यक्रमात टिळक शिक्षण महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# बासरीवादक पं.राजेंद्र कुलकर्णी यांना भीमसेन जोशी पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे**– दिग्गज कलाकारांचे गायन, वादन आणि रसिक प्रेक्षकांचा लाभलेला अभूतपूर्व प्रतिसाद यांमुळे १२ वा भारतरत्न पं. भीमसेन जोशी महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. गुरुकुल कलाश्री संगीत मंडळ आणि द औंध सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने औंध येथील भारतरत्न पं. भीमसेन जोशी रंगमंदिर येथे सदर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बेळगावचे जागतिक कीर्तीचे बासरीवादक पं. राजेंद्र कुलकर्णी यांचा भारतरत्न पं. भीमसेन जोशी पुरस्काराने सन्मान करण्यात आला. माजी महापौर दत्तात्रय गायकवाड, अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा विभागाचे समन्वयक असलेले रामराव नायक, गुरुकुल कलाश्री संगीत मंडळाचे संस्थापक व किराणा घराण्याचे गायक पं. सुधाकर चव्हाण आणि द औंध सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष वास्तुविशारद अभिजित सुभाष गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

पुरस्कार वितरण समारंभावेळी पुरस्काराला उत्तर देताना पं. राजेंद्र कुलकर्णी यांनी भारतरत्न पं. भीमसेन जोशी आणि सवाई गंधर्व यांचे नातू, प्रसिद्ध गायक पं. श्रीकांत देशपांडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. कुलकर्णी म्हणाले, ''पं. भीमसेन जोशी यांचे नाव एक कलाकार व एक व्यक्ती म्हणून खूप मोठे आहे. आज त्यांच्या नावाने दिलेला पुरस्कार माझ्यासाठी महत्त्वाचा आहे. पंडितजींना सगळे अण्णा म्हणायचे. माझे वडील अण्णांपेक्षा फक्त एका वर्षाने लहान. मला आठवते की सुरुवातीला जेव्हा अण्णा फार लोकप्रिय नव्हते तेव्हा वडिलांनी त्यांच्या किमान ४० ते ४५ खाजगी मैफली केल्या होत्या. त्या वेळी मी लहान असल्याने सोबत असायचो म्हणूनच संतवाणीमधील भजनांचे संस्कार बालवयातच माझ्यावर झाले.

या आधी तीन दिवसीय महोत्सवाच्या पहिल्या दिवशी किराणा घराण्याचे आश्वासक युवा गायक विराज जोशी, प्रसिद्ध बासरीवादक पं. प्रवीण गोडखिंडी आणि गायिका रोंकिणी गुप्ता यांनी आपली कला सादर केली. दुसऱ्या दिवसाची सुरुवात पं. सुधाकर चव्हाण यांच्या गायनाने झाली. यावेळी त्यांनी राग पुरिया धनाश्री गायला.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाचा समारोप पं. राम देशपांडे यांच्या गायनाने झाला. यावेळी त्यांनी राग मियां मल्हारची प्रस्तुती केली. यामध्ये त्यांनी 'अत धूम धार...' हा विलंबित तिलवाडा, 'अब घन बरसे...' ही श्रुत तीन तालातील रचना यांचे प्रभावी सादरीकरण केले. पं. देशपांडे यांना अजिंक्य जोशी (तबला), नीलय साळवी (संवादिनी) आणि गंधार देशपांडे यांनी स्वरसाथ केली. महोत्सवाच्या तिसऱ्या व शेवटच्या दिवसाची सुरुवात गायिका आरती नायक यांच्या गायन प्रस्तुतीने झाली.

महोत्सवाचा समारोप कथक नृत्यांगना शर्वरी जमेनीस आणि तबलावादक निखील फाटक यांच्या कथक तबल्याचा मिलाफ - कपल ऑफ मेनी थिंग्ज हा कार्यक्रमाच्या प्रस्तुतीने झाला.

# निसर्ग कवी ना धो महानोर!

ज्योतिर्मय साहित्य

मराठी साहित्यातील अनमोल रत्न , निसर्ग कवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना धो महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेड येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आईवडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असे. ना धो महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. ना धो हे त्यात सर्वात थोरले. त्यांचे प्राथमिक शाळेत गावातच झाले मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा बारा किलोमीटर अंतरावर होती. दहा बारा किलोमीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करत. लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार, निसर्ग यांची आवड होती त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली. मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगांवला उच्चशिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शकत प्रवेश घेतला. तिथे त्यांची काव्य प्रतिभा बहरली. त्यांच्यात असलेली काव्य प्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले. घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण थांबले पण कविता थांबली नाही. ते शेत शिवारात रमून कविता करू लागले. शेत शिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अदभुत निसर्ग कवितांनी त्यातल्या रंग गंधानी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद - लईंनी वाचक रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या ना धो महानोर सरांच्या कवितेचं केंद्रस्थान होते ते निसर्ग आणि स्त्रिया. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या. त्यांची एकूण अकरा कविता संग्रह प्रसिद्ध असून अजिंठा नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्य लेखनही सुरू ठेवले. गांधारी ही कादंबरी, गपसप व गावाकडच्या गोष्टी या लोककथा संग्रह, यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, शरद पवार आणि मी, आनंदयोगी पु ल. ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्य लेखन विपुल प्रमाणात केले असले तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होतं. त्यांनी अनेक चित्रपटांची गाणी देखील लिहिली आहेत. जैत रे जैत चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठावर आजही कायम आहेत. ना धो महानोर सर सहा वर्ष विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केले. महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले अगदी पद्मश्री देखील मिळाली मात्र निसर्ग कवी ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. ३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्ग कवी सर्वांना सोडून गेला. ना धो महानोर सर जरी कायमचे निघून गेले असले तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्ग कवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्ग कवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. निसर्ग कवी ना धो महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559